महाराष्ट्र शासन

क्र:टीईएम-२०१४/१३९६/प्र.क्र.२७२/तांशि-६
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० मार्च,२०१५

प्रति,

संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

संचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे,

संचालक, (प्रशिक्षण / व्यवसाय शिक्षण)
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

संचालक,
कला संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय: उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील शासकीय /अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालये/संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आधार क्रमांकाची नोंदणी करणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत उप महासंचालक, भारत सरकार, योजना आयोग, भारतीय विशिष पहचान प्राधिकरण, क्षेत्रिय कार्यालय, मुंबई-४०० ००५ यांच्या दिनांक १८/०९/२०१४ च्या पत्राची प्र सोबत जोडली आहे.

२. Unique Identification Authority of India (UIDAI) यांचेकडून बोटांचे ठसे व दृष्टीपटलां स्कॅनिंग करुन देशातील प्रत्येक व्यक्तीस त्याची ओळख पटविण्यासाठी विशिष्ट आधार क्रमांक वितरी करण्यात येतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीची स्वतंत्र ओळख तयार होऊन त्याची पुनरावृत्ती (Duplicatior



आवक क्र. 1660; दिनांक 31/03/2015

टाळणे शक्य होते. सदर आधार क्रमांक हा अधिकृत पुरावा मानलेला आहे. त्यामुळे केंद्र शासनाने आधार क्रमांकाचा वापर मोठया प्रमाणात करण्यासाठी, शिष्यवृत्ती, एलपीजी, पेन्शन, पासपोर्ट, जनधन योजना, मनरेगा, मोबाईल फोन, रेल्वे रिझर्वेशन इत्यादी क्षेत्रांमध्ये आधार क्रमांकाचा वापर करण्यात यावा यासाठी सूचना दिल्या आहेत. या क्रमांकाव्दारे योजनांची अधिक चांगल्या पध्दतीने अंमलबजावणी करणे शक्य होईल.

३. आपल्या संचालनालयाच्या अखत्यारीतील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचा तपशिल Data on Click पध्दतीने तात्काळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आणि विविध योजनांतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांना अचूकपणे लाभ देण्याचा उद्दिष्टाने आधार क्रमांकाची व त्यांच्या बँक खात्याची नोंद करणे आवश्यक आहे. त्यामुळे उच्च शिक्षण/व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना आधार क्रमांक व त्यांच्या बँक खाते क्रमांकाची नोंदणी करण्यात यावी. यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील शासकीय/अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ संस्थांच्या प्राचार्य/संचालक यांनी व्यक्तीशः लक्ष घालून संस्थास्तरावर विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाची नोंदणी करण्यासाठी संबंधित यंत्रणेशी संपर्क साधून विशेष मोहिम राबवावी. तसेच सर्व विद्यार्थ्यांची बँक खाते क्रमांकासह संपूर्ण माहिती ही संबंधित विद्यार्थ्याच्या आधार क्रमांकाशी संलग्नित करावी. सदरची कार्यवाही तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये पूर्ण करावी व याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(डॉ. किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

क्रमांक:-विकाअ/शिक्षण/आधारकार्ड/२०१५/ ७६६
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि. का. अमरावती.
दिनांक ०६/४/२०१५

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-१) प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित संस्था, यांना कळविण्यात येते की, वरील पत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.